सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता इको टास्क फोर्स बटालियन (२४०६ A२११) लेखाशीर्षांतर्गत अनुदान वितरण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः साववि-२०१७/प्र.क्र.१०७/फ-११
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १३ सप्टेंबर, २०१७

<u>वाचा</u> :-

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क. ७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७.
२) वित्त विभाग,शासन परिपत्रक, क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र. ६८/अर्थ-३, दि. १.०४.२०१७.
३) वित्त विभाग,शासन परिपत्रक, क्रमांक: अर्थसं-२०१७/प्र.क्र. ९४/अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७

<u>प्रस्तावना</u> :-

शासनाच्या महत्वाकांक्षी ५० कोटी वृक्ष लागवडीच्या प्रकल्पासाठी इको बटालियनच्या माध्यमातून मराठवाडा क्षेत्रात लागवडपूर्व कामे, प्रथम वर्ष काम करणे, तसेच इको बटालियनच्या सदस्यांची निवासाची व्यवस्था करणे, वनकुटी रुमची दुरुस्ती करणे, वनकुटीभोवती चैनलिंक कुंपन करणे, वनकुटी शेजारी स्वच्छतागृह बांधणे-(५) वनकुटी परिसरातील झाडाभोवती ओटयाचे बांधकाम करणे , वनकुटीसमोरील भागात पेव्हर ब्लॉक बसविणे, तंबु ओटे तयार करणे, किचन शेडची दुरुस्ती व सिमेंट, नालाबांधचे बांधकाम करणे (५) इ. कामे प्रस्तावित आहेत. त्याकरिता रु. २८००.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर करण्यात आलेला आहे. त्यापैकी सन २०१७-१८ च्या विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात उपरोक्त नियतव्ययापैकी पुरवणी मागणीद्वारे मागणी क्र. सी-०७-२४०६, वनीकरण व वन्यजीवन **(राज्य) योजनांतर्गत योजना ११० वन्य जीव संरक्षण ,इको टास्क फोर्स बटालियन (००)(२५) (२४०६ A२११) या योजनेंतर्गत सन २०१७-१८ करिता रु.१४००.०० लक्ष निधी** अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे या योजनेसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात सप्टेंबर, २०१७ ते मार्च, २०१८अखेर या कालावधीकरीता अर्थसंकल्पित निधीच्या ७०% मर्यादेत रु.९८०.०० लक्ष इतका निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात वन विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या **"इको टास्क फोर्स बटालियन (२४०६ A २११)"** हया नवीन योजनेकरिता राखून ठेवण्यात आलेल्या रु.२८००.००लक्षपैकी १४००.०० लक्ष निधी जुलै, २०१७ मधील पावसाळी अधिवेशनात अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. या अर्थसंकल्पित निधीपैकी माहे सप्टेंबर, २०१७ ते मार्च, २०१८ या सात महिन्यांकरीता योजनांतर्गत अर्थसंकल्पीत निधीच्या ७० टक्केच्या मर्यादेत म्हणजेच रु.९८०.०० लक्ष निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. विवरणपत्र-१ प्रमाणे निधी वितरणाचा कॅश फ्लो सोबत जोडला आहे.

२. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. मंजूर निधीचे जिल्हानिहाय वाटप करण्यास प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखड्याप्रमाणे, विहित कार्यवध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत

दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

३. सदर निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका यामध्ये उल्लेख केलेल्या तरतुदींनुसार व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

४. जिल्हानिहाय वितरीत तरतुदीची माहिती व राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाची/झालेल्या खर्चाचा तपशील शासनास दरमहा विहित प्रपत्रात सादर करण्यात यावा. तसेच योजनेचे संनियंत्रण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्यामार्फत व्हावे.

५. सदर योजने अंतर्गत होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ च्या मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र. सी-०७

२४०६, वनीकरण व वन्यजीवन (राज्य) योजनांतर्गत योजना

११० वन्य जीव संरक्षण

इको टास्क फोर्स बटालियन (००)(२५) (२४०६ A२११)

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९१३१५२७४८१११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b4a0f51184eb8e42644affc326f734133e2da973d2444 8c2cf323cb1cb2e347e, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2017.09.21 14:46:14 +05'30'

(विजय खेडेकर)
अवर सचिव, महसूल व वन विभाग

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख),नागपूर.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. मुख्य वनसंरक्षक व उप महासंचालक, सामाजिक वनीकरण वृत्त, कोकण ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर .
५. सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, (सर्व जिल्हे)
६. महालेखापाल, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई४०० ०३२.
९. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई
१०. वित्त विभाग, व्यय-०९, अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२
११. कार्यासन अधिकारी, फ-२,फ-७,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ निवडनस्ती/फ-११.

विवरणपत्र -१

सावंवि-२०१७/प्र.क्र.१०७/फ-११ दि. १३. ०९.२०१७ चे सहपत्र

योजनेचे नाव:- " इको टास्क फोर्स बटालियन " मुख्यलेखाशीर्ष :- (२४०६ A२११)

(रु. लाखात)

सविस्तर लेखाशीर्ष	अर्थ- संकल्पित तरतूद	वितरणा साठी उपलब्ध तरतूद	सप्टें., २०१७	ऑक्टो. २०१७	नोव्हें, २०१७	डिसें. २०१७	जाने. २०१८	फेब्रु, २०१८	मार्च, २०१८	एकूण
मागणी क्र. सी-०७ २४०६, वनीकरण व वन्यजीवन (राज्य) योजनांतर्गत योजना ११० वन्य जीव संरक्षण इको टास्क फोर्स बटालियन (००)(२५) (२४०६ A२११)	१४००.००	९८०.००	१४०.००	१४०.००	१४०.००	१४०.००	१४०.००	१४०.००	१४०.००	९८०.००

Vijay Ramchandra Khedekar

Digitally signed by Vijay Ramchandra Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b4a0f51184eb8e42644affc326f734133e2da973d24448c2cf323cb1cb2e347e, cn=Vijay Ramchandra Khedekar
Date: 2017.09.21 14:46:32 +05'30'

(विजय खेडेकर)
अवर सचिव, महसूल व वन विभाग